

## प्रशिक्षणाकरिता ग्रामसभांची निवड:

ग्रामसभा प्रशिक्षणाकरिता ग्रामसभांची निवड जिल्हा प्रशासनाकडून केली जाते. ज्या ग्रामसभांनी जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार केला आहे, अश्या ग्रामसभांची निवड प्रशिक्षणाकरिता केली जाते. एका ग्रामसभेतून ग्रामसभेचे अध्यक्ष, सचिव, दोन महिला व एक ग्रामसभा सदस्य अश्या एकूण पाच सदस्यांची निवड प्रशिक्षणाकरिता ग्रामसभा करीत असते.

## ग्रामसभा प्रशिक्षणास सुरुवात:

ग्रामसभा प्रशिक्षणाची पहिली बॅच दिनांक 11 एप्रिल ते 17 एप्रिल 2022 या कालावधीत गोंडवाना विद्यापीठात करण्यात आली होती. एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दोन टप्यात दिले जाते. पहिल्या सात दिवसाच्या निवासी प्रशिक्षणात खालील विषयांचे प्रशिक्षण दिले जाते.

1) पेसा कायदा 1996
2) सामुहिक वन हक्क कायदा 2006
3) जैव विविधता कायदा 2002 व 2004
4) रोजगार हमी कायदा
5) जैव विविधता नोंद वही
6) वन व्यवस्थापन आराखडा
7) गौण वन उपज संकलन, व्यवस्थापन व विपणन
8) ग्रामसभेचे रेकार्ड व अंकेक्षण

## प्रात्यक्षिक प्रशिक्षण:

गोंडवाना विद्यापीठातील सात दिवसाचे निवासी प्रशिक्षण झाल्यानंतर ग्रामसभा स्तरावर आठ दिवसांचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण. ग्रामसभेतील प्रशिक्षण प्राप्त पाच ग्रामसभा सदस्य ग्रामसभेतील संपूर्ण ग्रामसभा सदस्यांना प्रशिक्षण देतात. ग्रामसभेतील प्रात्यक्षिक प्रशिक्षणात कायद्यांचे प्रशिक्षण, शिवार फेरी करुन विरळ क्षेत्र शोधून काढणे, विरळ क्षेत्रात लावायच्या झाडांची यादी तयार करणे. या सोबतच वन तलाव व बंधारे बांधण्यासाठी जागेची निवड करणे. ग्रामसभेतील रेकार्ड अद्यावत करणे, नसतील तर ते तयार करणे, अंकेक्षण तयार करणे.

## प्रशिक्षणाकरिता सहयोगी मित्रांची निवड:

ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबवीत असतांना मार्गदर्शकांची कमतरता जाणवू लागली. मार्गदर्शकांची कमतरता भरुन काढण्यासाठी ग्रामसभा प्रशिक्षण झालेल्या प्रशिक्षणार्थीमधून 47 प्रशिक्षणार्थींची ट्रेनिंग ऑफ ट्रेनर करीता निवड करुन त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर त्यांची ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमात प्रशिक्षण देण्याकरिता सहयोगी मित्र म्हणून निवड केली.

## ग्रामसभा सक्षमीकरनाचे टप्पे:

1) जिल्हाप्रशासन व ग्रामसभा यांच्यात सामंजस्य करार.
2) सामुहिक वन हक्क प्राप्त ग्रामसभांचे प्रशिक्षण.
3) जिल्हा प्रशासन ग्रामसभांची नरेगा अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी करते.
4) वन व्यवस्थापन आराखडा तयार करणे.
5) ग्रामसभांना पायाभूत सुविधा पुरविणे.

## ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमाचा परिणाम:

1) ग्रामसभांमध्ये आदिवासी भागासी सबंधित कायद्यांची जागृती झाली.
2) ग्रामसभेत रेकार्ड अद्यावत करणे प्रारंभ झाले.
3) ग्रामसभांमध्ये वन व्यवस्थापन समितीची स्थापना झाली.
4) ग्रामसभेत महिलांचा सहभाग वाढला.
5) अध्यक्ष/सचिव/कोषाध्यक्ष या पदावर महिलांची नियुक्ती.
6) प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभांची नरेगा अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी.
7) ग्रामसभेमध्ये वन व्यवस्थापन व वनसंवर्धन आराखडा तयार करण्याची कार्यवाही प्रारंभ.

| | |
|---|---|
| सात दिवसीय निवासी प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा | : 248 |
| प्रशिक्षणार्थी | : 972 |
| वन व्यवस्थापन आराखडा प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा | : 50 |
| प्रशिक्षणार्थी | : 175 |



# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

जिल्हा प्रशासन गडचिरोली व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
यांच्या संयुक्त विद्यमाने

# एकल:
## लोकसहभागातून ग्रामसभा सक्षमीकरण







ग्रामसभा क्षमता सक्षमीकरण व प्रशिक्षण केंद्र
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
coordinator.ekal@unigug.ac.in



www.ekal.info

**एकल: लोक सहभागातून ग्रामसभा सक्षमीकरण**
**गोंडवाना विद्यापीठ व जिल्हा प्रशासन गडचिरोलीचा नाविन्यपूर्ण उपक्रम**

## ग्रामसभा सक्षमीकरणाची संकल्पना:

गडचिरोली जिल्ह्यातील सर्वसाधारण आदिवासी लोकांचा जीवनमान उंचाविण्यासाठी आवश्यक रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे. गडचिरोली जिल्ह्यातील 76 टक्के क्षेत्र वनाखाली आहे. एकूण वन क्षेत्रापैकी एक तृतीयांश भाग सामुदाईक वन संसाधनाचा आहे. यामधून 47 गौण वन उपज प्राप्त होतात. या गौण वन उपजांमध्ये आदिवासींचे उत्पन्न वाढविण्याची प्रचंड क्षमता आहे. वन उत्पादनाच्या संदर्भात आदिवासींमध्ये व्यावसाईक दृष्टीकोन निर्माण करण्याची गरज आहे. आदिवासींना व्यावसायीक क्रियाकलापांना समर्थन देण्याकरिता पायाभूत सुविधा निर्माण करून प्रशिक्षण देण्याची गरज आहे, ही बाब लक्ष्यात घेऊन ग्रामसभांच्या समन्वयातून आदिवासींचा शाश्वत विकास करण्यासाठी एकल: लोकसहभागातून ग्रामसभा सक्षमीकरण ही योजना गडचिरोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. संजय मीणा यांच्या संकल्पनेतून उदयास आली.

## ग्रामसभा सक्षमीकरणाची गरज :

गडचिरोली जिल्ह्यातील जनता मोठ्या प्रमाणात आपल्या उदरनिर्वाहाकरिता तसेच उपजीविकेसाठी नैसर्गिक संसाधने आणि जैव विविधतेवर अवलंबून आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी समुदायांनी समृद्ध जैव विविधतेच्या क्षेत्रात अनेक पिढ्यांपासून आपल्या सभोवतालच्या वातावरणाशी संवाद साधून पारंपारिक पर्यावरणीय ज्ञान प्राप्त केले. या संवादामधुनच आदिवासींची संस्कृती, जीवन शैली आकारास आली. संस्कृती आणि जीवन शैलीच्या माध्यमातून आदिवासींनी जैव विविधतेचे संवर्धन केले आहे.

## विद्यापीठात ग्रामसभा प्रशिक्षण केंद्राची सुरुवात :

लोक सहभागातून ग्रामसभांचे सक्षामीकरण व विकास या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता जिल्हा प्रशासनांनी गोंडवाना विद्यापीठासोबत दि.30 डिसेंबर 2021 रोजी सामंजस्य करार केला. या सामंजस्य करारानुसार प्रकल्पाच्या उद्देश्याची पूर्तता करण्यासाठी जिल्हा प्रशासनासोबत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली नॉलेज पार्टनर म्हणून आपली भूमिका पार पाडत आहे. ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी रित्या राबविण्यासाठी मा. कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे यांच्या निर्देशान्वये गोंडवाना विद्यापीठांतर्गत ग्रामसभा सक्षमीकरण व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले.

## अभ्यास मंडळ व अभ्यास गटांची निर्मिती :

ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ग्रामसभा क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्था व ग्रामसभेतील प्रतिनिधींचा समावेश असलेले ग्रामसभा अभ्यास मंडळ गठन करण्यात आले. त्यानंतर ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमाचा अभ्यासक्रम आराखडा तयार करण्याकरीता पुढील प्रमाणे पाच अभ्यास गट तयार करण्यात आले.

1) आदिवासी क्षेत्रासी सबंधित कायद्यांचा अभ्यास गट:-
   या अभ्यास गटांनी 1) भारतीय वन अधिनियम 1927 2) पंचायत राज अधिनियम 1958 3) महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम 1964 4) भूराजास्व संहिता 1966 प्रमाणे निस्तार हक्क 5) महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम 6) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना 2005 7) पेसा कायदा 1996 8) जैव विविधता कायदा 2002 व 2004 9) सामुहिक वन हक्क कायदा 2006
2) ग्रामसभांचे रेकार्ड हिशोब व अंकेक्षण अभ्यास गट
3) ग्रामसभेतील संघर्ष अभ्यास गट
   या अभ्यास गटात ग्रामसभेतील संघर्ष निर्मितीची कारणे, ग्रामसभा व प्रशासकीय यंत्रणा यातील संघर्ष व कारणे तसेच वाद निराकरनाचे उपाय यांचा अभ्यास.
4) गौण वन उपज अभ्यास गट
   या अभ्यास गटात गडचिरोली जिल्ह्यातील गौण वन उपजांचा अभ्यास तसेच गौण वन उपजांचे संकलन , प्रकिया व गुणवत्ता नियंत्रणाचा अभ्यास केला गेला.
5) पाणलोट क्षेत्र अभ्यास गट

## ग्रामसभा प्रशिक्षणाची उदिष्टे :

1) ग्रामसभा स्तरावर आदिवासींकरिता शाश्वत उपजीविका निर्माण करणे.
2) जैव विविधता संवर्धनासाठी धोरणांची अंमलबजावणी करणे.
3) वन संवर्धन व वन व्यवस्थापन योजनांच्या अंमलबजावणी करीता ग्रामसभांची क्षमता वाढविणे. ग्रामसभांना तांत्रिक सहाय्य करुन वनसंवर्धन व व्यवस्थापन योजनांचा विकास व अंमलबजावणी करणे.





## आदिवासींच्या समस्या जाणून घेण्यासाठी विद्यापीठांनी केलेले प्रयत्न:

ग्रामसभांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याच्या अगोदर गोंडवाना विद्यापीठांनी ग्रामसभा व आदिवासींच्या काय समस्या आहेत, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता विद्यापीठांनी गडचिरोली जिल्ह्यातील काही ग्रामसभांसोबत संपर्क प्रस्तापित केले. ग्रामसभांना क्षेत्र भेटी दिल्या. ग्रामसभेत जाऊन विविध विषयावर चर्चा केली. ग्रामसभेतील सदस्यांना चर्चेसाठी विद्यापीठात बोलाविले. ग्रामसभेसोबत काम करणाऱ्या समाज सेवकांसोबत चर्चा घडवून आणली. त्यातून विद्यापीठाला पुढील समस्या दिसून आल्या. 1) रोजगाराची समस्या 2) आरोग्याची समस्या 3) शिक्षणाची समस्या 4) वन उत्पादनाच्या योग्य विनियोगाचा अभाव 5) आदिवासी क्षेत्रासी सबंधित कायद्याचे अज्ञान.

## ग्रामसभा प्रशिक्षणाची माहिती पुस्तिका:

ग्रामसभांना प्रत्यक्ष ग्रामसभा सक्षमिकरनाचे प्रशिक्षण देण्यापूर्वी गोंडवाना विद्यापीठांनी पाच अभ्यास गटांची स्थापना केली. प्रत्यक्ष ग्रामसभांना भेटी दिल्या,ग्रामसभांना चर्चेकरिता विद्यापीठात बोलाविल्यानंतर गौण वन उपज अभ्यास मंडळानी खालील तीन विषयावर ग्रामसभा प्रशिक्षणाची माहिती पुस्तिका तयार करुन प्रशिक्षण देण्याची शिफारस केली, त्यात पुढील बाबींचा समावेश आहे.

1) आदिवासी क्षेत्रासी सबंधित कायदे
2) वन व्यवस्थापन आराखडा
3) ग्रामसभेचे रेकार्ड व अंकेक्षण

## ग्रामसभा प्रशिक्षणातील मार्गदर्शकांची निवड:

एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करणाऱ्या मुख्य मार्गदर्शकांची निवड मा.कुलगुरु, डॉ. प्रशान्त बोकारे, मा. प्र-कुलगुरु, डॉ.श्रीराम कावळे, मा. जिल्हाधिकारी श्री. संजय मीणा यांनी डेमो घेऊन मार्गदर्शकांची निवड केली. डॉ. देवाजी तोफा, डॉ. सतीश गोगुलवार, डॉ. कुंदन दुफारे, डॉ. रुपेन्द्रकुमार गौर, श्री. केशव गुरनुले यांनी विविध विषयावर सादरीकरण केले.